# IISER मधील माझे अनुभव

– श्रुती व्हनोळी

मी जेव्हा पहिल्यांदा IISER ला गेले. तेव्हा थोडीशी भिती वाटत होती. घरी परत यावंसं वाटत होतं. पण जसजसे दिवस गेले व शेवटचा दिवस आला तेव्हा मात्र मला तेथून निघवत नव्हतं. तिथे मी खूप रमले. पहिल्यांदा मला तिथे कुणाचीच ओळख नव्हती. पण नंतर नंतर मला सर्वांची ओळख झाली. पहिल्या दिवशी जो मनोरंजनात्मक कार्यक्रम झाला. तो मला खूप आवडला. तिथे आमच्या गावचे डॉ. राजेंद्र हिरेमठ सरांना पाहून खूप चांगलं वाटलं. पहिल्या दिवशी मजा आली. पण दुसऱ्या दिवशीपासुन आमची धावपळ सुरु झाली.

तिथे सकाळी 5 ला उठावं लागायचं. पण मी कधीच एवढ्या लवकर उठले नव्हते. पण तिथे मला आपोआपच जाग येई. नंतर तिथे आमचा योगावर्ग असायचा. योगा म्हटलं की माझ्या अंगावर काटा यायचा. पण तिथल्या रंजना देवल मॅडमांनी योगाचं महत्त्व पटवुन दिलं व योगाही खूप चांगल्या पद्धतीने शिकवलं. लेक्चरसाठी आम्हांला C.V. Raman Hall मध्ये घेऊन जायचे. तो Hall मला खूप आवडला. तेथील लेक्चर खूप प्रभावी होते. जसे की शिवप्रसाद पाटील सरांनी Hybrid कशा हालचाली करतात याविषयी माहिती दिली. मधुकर कुलकर्णी सरांचे लेक्चर तर मला खूपच आवडले. यातूनच मी माझे ध्येय ठरवले. आशा अग्निहोत्री मॅडमांनी colour wheel विषयी माहिती दिली. शांती पिसे मॅडमांनी गणित विषयावर लेक्चर दिलं होतं. त्यामधील त्यांनी सांगितलेल्या गणिताच्या Tricks मला खूप आवडल्या. शेवटच्या दिवशी ओमप्रकाश येमुल सरांनी Plastic वर खूप चांगलं लेक्चर दिलं. त्यामध्ये त्यांनी plasticचे फायदे व तोटे सांगितले. या सर्व लेक्चरांचा आम्ही आमच्या आयुष्यात पुरेपूर फायदा करुन घेऊ. तिथे आम्ही

② स्मृती

गौरी गाडगिळ यांचा yellow नावाचा पिक्चर पाहिला. त्या पिक्चरमधून मला "कोणत्याही परिस्थीतीत कितीही मोठं संकट आलं तरी त्यावर मात करता येतं" हा संदेश मिळाला. तिथे आम्हांला CME व IITM ला भेट देण्यासाठी घेऊन गेले होते. तिथे मला खूप मजा आली. तिथे आम्हांला भरपूर माहिती मिळाली. IISER मधील chemistry Lab मला खूप आवडली. तिथे आम्ही स्वत: प्रयोग केले. तेथील Balan Hall सुद्धा मला खूप आवडली. कारण तिथे आम्हांला खूप ध्यान व घरात करता यावे असे प्रयोग दाखवण्यात आले. आम्ही तिथे Telescope मधून गुरु, शुक्र, चंद्र पाहिल्यावर मी खूप आनंदी झाले. कारण आम्ही फक्त पुस्तकात वाचलो होतो. पण आम्ही तिथे प्रत्यक्षात अनुभवले..

तेथील सर मॅडमसुद्धा खूप चांगले होते. त्यांच्यातील गोडसे सर मला खूप आवडले. त्यांचा स्वभाव खूप मजेशीर होता. ते सर प्रत्येक कार्यक्रमाला आमच्या सोबतच असायचे. प्रत्येक काम उत्साहाने करायचे. त्यांची ही जिद्द, चिकाटी पाहून माझ्यात एक नवीन उत्साह निर्माण झाला. मलाही गोडसे सरांसारखंच काहीतरी करावसं वाटत होतं. तेथील मला एक गोष्ट प्रचंड आवडली ती म्हणजे तिथला सुंदर निसर्ग. त्या निसर्गामध्ये मी खूप रमले होते. त्यामुळेच हे पाच दिवस कसे गेले मला कळालेच नाही. हे पाच दिवस मी माझ्या आयुष्यात कधीच विसरणार नाही.

धन्यवाद !